INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**February-2019 Special Issue – 128**

## २१ व्या शतकात प्रसार मध्यामांतर्गत भाषाविषयक चिंतन व आव्हाने

**Guest Editor:**
Dr. S. G. Baviskar ,
Principal,
MVPS's Arts & Commerce College, Soygaon
Tal. Malegao, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue:**
Dr. Smt. U. P. Shirode
Prof. Smt. S. M. Ahire
Dr. Smt. V. M. Desai
Prof. J. D. Pawar
Dr. Manoj Jagtap

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 128-२१ व्या शतकात प्रसार मध्यमांतर्गत भाषाविषयक चिंतन व आव्हाने
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Effectiveness of Social Media for Development of Vocabulary in English Language at Junior College Level | Shri. Navnath Hegade | 03 |
| 2 | The Role of Cultural Content and Cultural Context in Language Instruction | Prof.Dr. Vrushali Desai | 09 |
| 3 | Language : Origin and Development | Mr. hubham Pardeshi | 13 |
| 4 | English: The Global language | Shraddha Sanajy Hire | 14 |
| 5 | Language: Origin and Development | Utkarsha Joshi | 16 |
| 6 | सूचना प्रौद्योगिकी और हिंदी | निलेश एस. पाटील | 20 |
| 7 | इक्कीसवी सदी में हिंदी भाषा का विषय चिंतन ओर चुनौतीयाँ | डॉ. उषा पी.शिरोडे | 22 |
| 8 | प्रसार माध्यमो में हिंदी भाषा की स्थिती और गती | प्रा.दिलीप बच्छाव | 26 |
| 9 | हिंदी साहित्य एव संस्कृति संवर्धन | प्रा.जयवंत पवार | 28 |
| 10 | हिंदी भाषा: व्युत्पत्ती, उद्भव एवं विकास | प्रा. युवराज गातवे | 30 |
| 11 | इनसायक्लोपेडीया ब्रिटानिका | नितीन पंडित | 32 |
| 12 | सूचना प्रौद्योगिकी युग में हिंदी भाषा का महत्त्व | प्रा.दीपक आहिरे | 36 |
| 13 | सूचना प्रौद्योगिकी युग में हिंदी भाषा का महत्त्व | प्रा. निलेश देशमुख | 38 |
| 14 | माहिती तंत्रज्ञानाच्या भाषेचे स्थान | शशिभैया त्रिभुवन | 40 |
| 15 | माहिती तंत्रज्ञानाच्या मराठी भाषेचे स्थान | डॉ. सायली आचार्य | 43 |
| 16 | अहिराणी भाषेतील साहित्य वं संस्कृति संवर्धन | डॉ.रत्ना जवारस | 47 |
| 17 | भाषा : उदय आणि विकास | प्रा.योगेश वाळूंज | 53 |
| 18 | सामाजिक भाषा विज्ञान व संस्कृतीच्या नव्या दिशा : एक अभ्यास | प्रा. संगीता आहिरे | 57 |
| 19 | प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा | प्रा. विठ्ठल जाधव | 60 |
| 20 | मराठी भाषेची स्थिती-गती | सौ. सपना सोनवणे | 63 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 128-२१ व्या शतकात प्रसार मध्यामांतर्गत भाषाविषयक चिंतन व आव्हाने
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# मराठी भाषेची स्थिती- गती

**सौ. सपना वाल्मीक सोनवणे**
के.बी.एच.आर्टस , सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज
निमगाव ता.मालेगाव जि.नाशिक.

मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा कसा वेगळा आहे किंवा श्रेष्ठ आहे हे सांगताना 'मानव हा विचार करणारा प्राणी आहे.' 'मानव हा बुध्दिमान प्राणी आहे', 'मानव हा सामाजिक प्राणी आहे.' असे वर्णन सामान्यपणे केले जाते. पण त्याहीपेक्षा 'मानव हा भाषिक प्राणी आहे.' भाषा बोलणारा, भाषेचा उपयोग सर्व व्यवहारात करणारा प्राणी आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. भाषेच्या साहाय्याने मानवाने नैसर्गिक अडचणींवर मात करून जीवनसंघर्षात विजयी होऊन प्रत्येक क्षेत्रात आपला विकास करून घेतला आहे. आपले जीवन सुखी, संपन्न आणि समृध्द करून घेतले आहे.

'भाष्' या धातूचा अर्थ बोलणे असा होतो. भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पध्दती, व्यवस्था होय. माणूस बोलतो म्हणजे काय करतो? विशिष्ट प्रकारचे आवाज काढतो, त्याला ध्वनी असे म्हणतात. हे ध्वनी आपल्या वागिंद्रियांच्या साहाय्याने तो वेगवेगळ्या स्वरूपात काढू शकतो. 'कंठाद्वारे निघालेला सार्थ ध्वनी समुच्चय म्हणजे भाषा', 'ध्वनिमय शब्दांद्वारा विचारांचे प्रकटीकरण म्हणजे भाषा,' भाषा म्हणजे मनुष्याने परस्पर विचारविनिमयासाठी प्रतिकात्मक ध्वनिसमूहांची रूढ केलेली सुसंगत व सर्वमान्य व्यवस्था' किंवा भाषा म्हणजे सांकेतिक परंतु परंपरागत मौखिक प्रतीकांचा सामाजिक आंतर व्यवहारांकरिता उपयोगात येणारा आकृतिबंध होय.' भाषा ही प्रतिकात्मक वा सांकेतिक असते. निरनिराळ्या समाजामध्ये ध्वनींची वेगवेगळ्या प्रकारची प्रतीक व्यवस्था निर्माण झाल्यामुळे समाजपरत्वे भाषा निर्माण झाल्या.

माणूस जन्माला येतो तोच मुळी माथ्यावर अनेकविध ऋण घेऊन. प्रत्येक माणसाच्या जीवनात माती, मायभूमी आणि मातृभाषा या तीन गोष्टींना अनन्यसाधारण स्थान आहे. माती त्याला अन्न देते, आधार देते. मातीच्या सान्निध्यात त्याला सुरक्षितता लाभते. मायभूमी त्याला आसरा देते. मायभूमीपासून दूर फेकला गेलेला माणूस निराधार होतो, पोरका होतो मग त्याला परक्या देशात कितीही धन मिळाले तरी तो तेथे परकाच राहतो. तेथे त्याला आपलेपणा गवसत नाही. मातीचे व मायभूमीचे जेवढे महत्त्व असते तेवढेच महत्त्व त्याला मातृभाषेचेही असते कारण मातृभाषा त्याच्यावर सुयोग्य संस्कार करीत असते. मागच्या अनेक पिढ्यांच्या अनुभवांचा वारसा ती त्याच्यासाठी घेऊन येते. या संस्कारातून त्याचे व्यक्तिमत्त्व संपन्न होते. बालकाला जीवनाचा पहिला परिचय होतो. तो त्याच्या मातेच्या बोलण्यातून. त्याच्या हर्ष- विवादाच्या, प्रीती- भीतीच्या, पहिल्यावहिल्या भावभावना प्रकट होतात त्या मायबोलीतून Mothertongue is language of heart मातृभाषा म्हणजे हृदयाची भाषा माणसा माणसातील हृदयसंवाद हा मातृभाषेतूनच चालतो. माणूस कितीही बहुभाषी झाला तरी खऱ्या जिव्हाळ्याच्या व जिव्हारीचा उद्‌गार त्याच्या मातृभाषेतूनच प्रकट होतो. मातृभाषेच्या संस्काराचे क्षेत्र फार व्यापक आणि फार दूरवर पोहोचणारे असते. भाषाच मुलाला जीवनरस पुरविते, याच भाषेच्या आधारेच तो विश्वाचे आकलन करून घेत असतो. या जीवनरसानेच त्याचे व्यक्तिमत्त्व उमलते. श्री. ग.वि. अकोलकर म्हणतात 'व्यक्तित्वाच्या वेलीवर उमलणाऱ्या सुंदर सुमनांना मातृभाषा हाच जीवनरस आहे.'

मराठी भाषा ही समृद्ध भाषा आहे. मराठी आपली मातृभाषा असल्यामुळे आपण ती फारशी खोलात जाऊन शिकण्याचा प्रयत्न करत नाही. आपल्याला ती मातृभाषा असल्यामुळे फारच सोपी वाटते परंतु असे नाही. मराठी भाषेत एका वाक्याचे अनेक अर्थ निघू शकतात. आपल्या या भाषेमध्ये आपली संस्कृती ओतप्रोत भरलेली दिसून येते. भाषा ही त्या समाजाच्या संस्कृतीची वाहक असते. मराठी भाषेत आपण वडीलधाऱ्या व्यक्तींना 'अहो' असे



Scanned by CamScanner

संबोधतो पण हेच जर उदाहरण आपण इंग्रजी भाषेत पाहिले तर दोन वर्ष वयाच्या मुलाला 'He' आणि सत्तर वर्षे वयाच्या वृद्धालाही 'He' म्हणजेच इंग्रजी भाषेतून, इंग्रजांची संस्कृती (?) दिसून येते अशी ही इंग्रजांची आदर्श संस्कृती असतानाही आपण अंधानुकरणाने या भाषेचा वापर करतो.

मराठी ही विविधांगी भाषा आहे. तिचे सामर्थ्य अचाट आहे. मराठी भाषेतील वाङ्मय वा साहित्यातून त्याची समृध्दी लक्षात येते. या साहित्यातूनच ज्ञानेश्वर माऊलींनी 'अमृतातेही पैजा जिंके' अशा अक्षरसंपदेच्याद्वारे 'अरुपाचे रुप' दाखविले आणि मराठीतून ज्ञानाचा प्रसार करण्याचा संकल्प सोडला. नाथांना मातृभाषेची ही थोरवी कळली होती म्हणून तर त्यांनी समाजाचा विरोध सहन करुनही मातृभाषेतूनच काव्यरचना करण्याचा आग्रह धरला. मातृभाषेतून आपले विचार रोखठोकपणे व विलक्षण तळमळीने व्यक्त करून तुकाराम महाराजांनी अभंगरचना केली आणि समाजप्रबोधनासाठी समर्थांना देखील ही मातृभाषाच उपयोगी पडली. परंतु सद्यःस्थितीचे जर आपण अवलोकन केले, तर आपण मातृभाषेबाबत बरेच उदासिन आहोत, एवढेच नाही तर आपण मराठीची उपेक्षा देखील करीत आहोत असे खेदाने परंतु प्रामाणिकपणे कबुल करावे लागते. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजी भाषेचा पगडा आपल्या मनावर होता. आपल्या देशात इंग्रजांनी केवळ राजकीय सत्ताच स्थापन केली नाही, तर आपल्या मानसिक आणि सांस्कृतिक जीवनावरही पाश्चात्य विचारांचा प्रभाव पाडला आणि स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, यांच्याबद्दलचा स्वाभिमानही नष्ट केला. आजही इंग्रजीच्या वैचारिक आणि सामाजिक गुलामगिरीतून आपण मुक्त झालेलो नाही. साध्या साध्या बोलण्यातही किती इंग्रजी शब्द सतत येतात हे पाहण्यासारखे आहे. 'धन्यवाद' च्या ऐवजी 'थँक्स' 'शुभेच्छा' देण्याऐवजी आपण 'विश यू गुड लक' म्हणतो. 'पत्र टाकून येतो' असे म्हणण्यापेक्षा 'लेटर पोस्ट करून येतो' असे सहजपणे बोलतो.

इंग्रजी भाषेवर असामान्य प्रभुत्व मिळवून वक्ते, लेखक तत्त्वज्ञानी, शास्त्रज्ञ या नात्यांनी काहींनी देशाचे नाव गाजवून त्याचे भवितव्य उज्ज्वल केले. असे असले तरी सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने हानीच फार झाली. परकीय भाषेतून ज्ञान घेण्याच्या प्रयत्नात स्वतंत्र विचारशक्ती खुंटली. पोपटपंची सुरू झाली. नोकरीच्या ध्येयाने कारकुनी वृत्तीचा गुलामी पगडा बसला. इंग्रजांच्या झगमगाटात स्वतःचा धर्म, विद्या आणि संस्कृती तुच्छ वाटू लागली. त्यांचा विसर पडला आणि नवा सुशिक्षित वर्ग स्वाभिमानाला पारखा झाला. इंग्रजीमुळे बौध्दिक क्षेत्राप्रमाणेच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांवरही खूप विपरित परिणाम झाले. जातिभेद- वर्णभेद- धर्मभेद यांनी आधीच चिरफळ्या झालेल्या समाजात सुशिक्षित- अशिक्षित असा नवीन भेद निर्माण होऊन त्यात भयानक दरी निर्माण झाली.

शिक्षणक्षेत्रात अजूनही मराठी हे अध्ययन अध्यापनाचे समर्थ माध्यम होऊ शकते यावर अनेक मराठी शिक्षक, प्राध्यापक आणि विचारवंतांचा विश्वास नाही विज्ञानाच्या अभ्यासासाठी तर अनेकांचा मराठीला विरोध आहे. कित्येक शाळांमधून विज्ञान विषयांच्या अभ्यासक्रमासाठी मराठीचे माध्यम बंद करण्यात आले आहे. आपल्याला मराठीतून बोलता- लिहिता येत नाही. याची खंत त्यांना वाटत नाही. याउलट, आम्ही इंग्रजीतून बोलू शकतो याबद्दल अभिमान, अहंकार, त्यांच्या बोलण्यातून डोकावत असतो. खरेतर परकीय भाषेतून चांगल्या प्रकारे अभिव्यक्ती करता आली नाही तर एवढे वाईट वाटण्याचे कारण नाही परंतु, मातृभाषेतून मराठीतून प्रगटीकरणाची असमर्थता दर्शविणे, जाणविणे वा असणे ही गोष्ट मात्र लज्जास्पद वाटायला हवी. भाषेचा अभिमान नसणे हे संस्कृतीच्या कृतघ्नपणाचे लक्षण समजले जाते. मराठी हा फार काही महत्त्वाचा वा दर्जेदार विषय नाही. मराठी काय कोणीही पास होतो! किंवा मराठी कोणीही शिकवू शकतो! अशा सर्वसाधारण समजुती आहेत.

एकीकडून आपण मराठीच्या प्रेमाचा पुळका दाखवतो. मराठीच्या विकासाचा आव आणतो. तर दुसरीकडून प्राथमिक वर्गापासूनच आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिकायला पाठवतो. आमचा मुलगा कॉन्व्हेंटमध्ये जातो याचाच आम्हाला अभिमान! मुले आपल्याला 'आई', 'बाबा' न म्हणता 'मम्मी', 'डॅडी' म्हणतात.याचेच आईवडिलांना



Scanned by CamScanner

भूषण वाटते किंबहुना, आईवडीलच त्यांना तसे शिकवितात. त्यामुळे मुलांच्या अंगी मराठी बाणा निर्माण होण्याची अपेक्षाच करायला नको.

मराठीतील साहित्य हा आपल्या अभिमानाचा ठेवा, पण मराठीत निर्माण झालेल्या मराठी ग्रंथांचा आस्वाद किती जण घेतात? आपल्या वाचनाची झेप मासिकांपर्यंत, रहस्यकथांपर्यंत किंवा चटकमटक आणि भडक कथा कादंबऱ्यांपर्यंत.

या सगळ्यांतून बाहेर येण्यासाठी प्रथम मराठी संबंधीची न्यूनगंडाची भावना, मनातून काढून टाकली पाहिजे. सातशे वर्षापूर्वी ज्ञानेश्वरांनी 'मराठीचिचे नगरी', 'ब्रह्मविद्येचा सुकाळु' करुन दिला आणि 'साहित्य सोनियाच्या खाणी' उघडून दिल्या. मग तो तर मराठीचा उदयकाळ होता! मराठी त्यावेळी बाल्यावस्थेत होती. अविकसित अवस्थेत जर तिच्या अंगी एवढे सामर्थ्य होते, तर आज प्रौढावस्थेत आल्यानंतर आधुनिक विद्यांचे वहन तिला पेलणार नाही यावर कोणाचा विश्वास बसेल? केशवसुत म्हणतात, 'परि एक एक तू शब्द नवा जो शिकसी! शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी'. या ओळीप्रमाणेच मराठीच्या शब्दाशब्दात प्रचंड सामर्थ्य वास करीत आहे, असा आत्मविश्वास मराठीच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केला पाहिजे. कारण मानवाने जरी भाषा घडविली असली तरी भाषेने मानव घडविला त्याला सुशिक्षित, सुसंस्कृत केले त्यामुळे आपण व्यवहारात सुध्दा शुद्ध मराठी भाषेचाच वापर करीन असा निर्धार केला पाहिजे.

**संदर्भ :**

1. कृ.पां. कुलकर्णी, (२००९), 'मराठी भाषा उद्गम व विकास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
२. प्रा. डॉ. मधुकर मोकाशी, (२००१), 'मराठी भाषेची स्थिती आणि गती', साहित्य कलायात्री प्रकाशन, पुणे

RESEARCH JOURNEY



Scanned by CamScanner